**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक ०८ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. **प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या दशकपूर्ती निमित्त प्रधानमंत्र्यांचा निवडक लाभार्थ्यांशी संवाद.**
2. **नागपूर इथं राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेची स्थापना करण्यात येणार - राज्य मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय.**
3. **नवीन वाळू धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी.**
4. **४४ पूर्णांक 2 अंश सेल्सिअसह अकोला जिल्हा आज विदर्भात सर्वाधिक उष्ण, उद्या नागपुरसह अकोला, अमरावती आणि चंद्रपूर जिल्ह्यात उष्णतेची लाट.**

मुद्रा योजना

होतकरु तरुणांमधे उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रसरकारनं सुरु केलेल्या प्रधानमंत्री मुद्रा योजनेला आज दहा वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज त्यांच्या निवासस्थानी योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी विविध लाभार्थ्यांनी उद्योजकतेचे अनुभव सांगितले. देशातल्या तरुणांना सक्षम, स्वावलंबी करणं आणि त्यांना आत्मविश्वास मिळवून देणं तसंच केवळ नोकरी शोधणाऱ्यांऐवजी रोजगार निर्माण करण्याची क्षमता निर्माण करणं हे या योजनेचं उद्दिष्ट असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे. लाभार्थ्यांपैकी निम्मे अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी प्रवर्गातले असून ७० टक्क्यांहून अधिक लाभार्थी महिला आहेत.-

***सबसे ज्यादा लोन के लिए अप्लाई करने वाली महिला है, सबसे ज्यादा लोन प्राप्त करने वाली महिला है और सबसे जल्दी रीपेमेंट करने वाली भी महिला है और एक बार पैसा आये तो उसका सदुपयोग करना। ये अपने आप में आपके जीवन में भी एक डिसिप्लिन ले जाता है। ये जीवन को बनाने का एक अवसर देता है।***

मुद्रा योजनेअंतर्गत तामिळनाडूमध्ये सर्वाधिक कर्जवाटप झालं असून त्याखालोखाल उत्तर प्रदेश आणि कर्नाटकचा क्रमांक लागतो तर केंद्रशासित प्रदेशांमध्ये जम्मू-काश्मीर आघाडीवर आहे. मुद्रा योजनेला आंतरराष्ट्रीय स्तरावरही मान्यता मिळाली असून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं भारताच्या सर्वसमावेशक उद्योजकतेला चालना देण्याच्या भूमिकेचं कौतुक केलं आहे. गेल्या दहा वर्षांत या योजनेअंतर्गत ५२ कोटींहून अधिक रकमेचं कर्ज मंजूर करण्यात आलं आहे. प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत सूक्ष्म आणि लघु उद्योगांना २० लाख रुपयांपर्यंत विनातारण कर्ज दिलं जातं.

## आपत्ती व्यवस्थापन-मंत्रिमंडळ निर्णय

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत नागपूर इथं  राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे आपत्कालीन व्यवस्थापनासाठी राज्यस्तरावर एक मजबूत यंत्रणा तयार होणार आहे. या संस्थेमुळे आपत्कालीन परिस्थितीत प्रभावी मदत आणि बचाव कार्य करता येईल तसेच राज्यात येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती आणि इतर आपत्कालीन घटनांना प्रभावीपणे सामोरं जाण्यासाठी ही संस्था मदत करेल.

## जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद

अकोला इथं काल झालेल्या जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत एक हजार २३८ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे विविध ९५ उद्योग व्यवसायांशी सामंजस्य करार करण्यात आले. अकोल्याचे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी ही माहिती दिली. गुंतवणुकीसाठी जिल्ह्यात पोषक वातावरण तयार झालं असल्याचं ते यावेळी म्हणाले.

## आरसीओएनएफ नागपूर

नागपूरच्या अमरावती रोड स्थित गोंडखैरी येथील केंद्रीय कृषी मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या क्षेत्रीय केंद्रीय आणि नैसर्गिक कृषी केंद्र -आरसीओएनएफ नागपूर तसेच देवलापार येथील गोविज्ञान संशोधन केंद्र नागपूर यांच्यामध्ये नुकतेच एक सहयोग बैठक संपन्न झाली. या बैठकीदरम्यान जैविक आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्याकरिता नव-नवीन संशोधन, देशी गायी तसेच पशुधनावर आधारित कृषी प्रणाली आणि शाश्वत शेती पद्धतीवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. या बैठकीदरम्यान तज्ञांनी शेतकऱ्यांना पर्यावरण अनुकूल आणि लाभदायक कृषी तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्यासाठी विचार मंथन केले. गोविज्ञान अनुसंधान केंद्र देवलापारच्या कार्यकारी मंडळ आणि सदस्यांनी  आरसीओएनएफला भेट दिली. यावेळी गोविज्ञान अनुसंधान केंद्राचे अध्यक्ष पद्मेश गुप्ता, कार्याध्यक्ष डॉ.हेमंत जांभेकर, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज तत्वादी उपस्थित होते. आरसीओएनएफचे प्रादेशिक संचालक डॉ.अजयसिंह राजपूत यांनी आरसीओएनएफच्या अद्यावत प्रयोगशाळा तसेच संबंधित विभाग आणि त्यांची उपयुक्तता याबाबत सदस्यांना विस्तारपूर्वक माहिती दिली. आरसीओएनएफ नागपूर केंद्र शासनाच्या कृषी आणि शेतकरी कल्याण विभागातील एक उपक्रम असून नागपूर हे पश्चिम मध्य क्षेत्राचे मुख्यालय कार्यरत असून या अंतर्गत महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, आंध्र प्रदेश ,तेलंगाना तसेच दादरा  नगर हवेलीचा देखील यांच्या कार्यक्षेत्रात समावेश होतो. या सहयोग बैठकीच्या नंतर या दोन्ही

संस्थांमध्ये लवकरच एक सामंजस्य करार देखील होणार आहे अशी माहिती डॉ.अजयसिंह राजपूत यांनी दिली आहे.

वाळू धोरण-मंत्रिमंडळ निर्णय

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्याच्या मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली आहे. राज्यभरातील घरकुलांसाठी ५ ब्रासपर्यंत मोफत वाळू देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. या धोरणात डेपो पद्धत बंद करून उपविभागात दोन वर्षांसाठी लिलाव केले जाणार आहेत. खाडीपात्रात ही लिलावाची मुदत तीन वर्षासाठी असेल. धरणांमधून वाळू उत्खनन करून त्यांची क्षमता वाढवण्यावरही आजच्या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली. मंत्रिमंडळाच्या पुढच्या बैठकीत कृत्रिम वाळू धोरण आणलं जाईल. यापुढे सर्व सरकारी बांधकामासाठी हीच वाळू वापरण्याचा विचार असल्याचे ते म्हणाले. तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र अधिनियम-१९७१ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे झोपडपट्टी पुनर्वसनाला गती मिळणार आहे. तसेच राज्यातील शासकीय आयुर्वेद /होमिओपॅथी /युनानी /योग व निसर्गोपचार महाविद्यालयांतील कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर भरावयाच्या अध्यापकांचे दरमहा एकत्रित ठोक मानधन निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे जन्मशताब्दी महोत्सव

चक्रवर्ती सम्राट अशोक, बॅरि.राजाभाऊ खोब्रागडे, महापंडित राहुल सांस्कृत्यायन, महात्मा ज्योतिबा फुले, भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्व क्रांतिकारी महापुरुषांच्या जयंती तथा स्मृतिदिनानिमित्त अभिवादन परिक्रमा करण्याकरिता बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे प्रतिष्ठान, बाबु हरदास एल. एन. बहुद्देशिय संस्था, बौद्ध इतिहास संस्कृति आणि संशोधन संस्था आणि नागार्जून संग्रहालय यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या 9 एप्रिल ते 14 एप्रिल 2025 पर्यंत बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे सभागृह डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्व्हेंशन सेंटर समोर, सिद्धार्थ नगर, कामठी रोड, नागपूर येथे चित्रप्रदर्शनीचे आयोजन केले आहे. या चित्रप्रदर्शनीचे उद्घाटन भदंत नागदीपंकर महाथेरो यांच्या हस्ते स. 9:30 वाजता होईल. तत्पूर्वी सकाळी 8:30 वाजता बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या इंदोरा चौक येथील पुतळ्याला माल्यार्पण करण्यात येईल.

हवामान

४४ पूर्णांक 2 अंश सेल्सिअसह अकोला जिल्हा आज विदर्भात सर्वाधिक उष्ण ठरला, अमरावती आणि चंद्रपूर या ठिकाणी कमाल तापमान 43 पूर्णांक 6 अंश तर नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ या सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 42 अंश

सेल्सिअसच्या पुढे आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये देखील तापमान 40 ते 41 अंश दरम्यान आहे. आज अकोला अमरावती आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे, तर उद्या नागपुरसह अकोला अमरावती आणि चंद्रपूर या जिल्ह्यात उष्णतेची लाट येण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. परवा अर्थात 10 एप्रिल रोजी मात्र चंद्रपूर, यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहू शकतं.

आपले सरकार' पोर्टल

महाराष्ट्र राज्य शासनाच्या विविध विभागांच्या सेवा 'आपले सरकार' पोर्टलवरून प्रदान केल्या जातात. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (महाआयटी) यांनी हे पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलची नियमित देखभाल आणि तांत्रिक अद्यतनासाठी १० एप्रिल २०२५ ते १४ एप्रिल २०२५ असे पाच दिवस या पोर्टलची सेवा बंद राहील. या काळात कार्यालयीन कामकाजाचा फक्त एक दिवस वगळता उर्वरित सर्व दिवस सार्वजनिक सुट्टीचे आहेत. राज्यातील सर्वसामान्य नागरिक, ग्रामीण आणि शहरी भागातील 'आपले सरकार' केंद्र चालक, 'सेतू' केंद्र चालक, संबंधित ग्रामपंचायती आणि शासकीय कर्मचारी यांनी कृपया या पूर्वसूचनेची नोंद घ्यावी. या कालावधीत 'आपले सरकार' सेवा पोर्टलमार्फत दिली जाणारी कोणतीही सेवा उपलब्ध असणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी असे कळविण्यात आले आहे.

*****